“राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस” (National Apprenticeship Promotion Scheme-NAPS) **प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- राशिउ-२०२२/प्र.क्र. ६४/व्यशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०२२

**संदर्भ** :-

१ शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१, १९६१ चा अधिनियम क्र. ५२ (१ नोव्हें. १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे)

२ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ दिनांक : ०९.०२.२०१८ व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ (अधिसूचना) दिनांक ०५.०४.२०१८

३ कौशल्य विकास आणि उदयोजकता मंत्रालय, भारत सरकार अधिसूचना, नवी दिल्ली दिनांक :- २५.०९.२०१९

४ केंद्र शासनाचे क्र. File no. MSDE-०१(०१)/२०१८-AP (PMU) दिनांक:- ०१.१०.२०१९ चे पत्र

५ केंद्र शासन, वित्त विभागाचे क्र. F.No.1(13)PFMS/FCD/2020 दिनांक २३.०३.२०२१ चे पत्र

**प्रस्तावना :-**

कुशल कारागीरास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दिल्यानंतर उद्योगात असणाऱ्या प्रक्रियांमध्ये लागणारी यंत्रसामुग्री तसेच नवीन व आधुनिक तंत्रज्ञानानुसार ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन कुशल कारागीर सर्व दृष्टीने स्वावलंबी बनावा यासाठी “शिकाऊ उमेदवारी योजना” अस्तित्वात आली.

औद्योगिक आस्थापनांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा विनियोग करुन कुशल कारागीरास आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी शिकाऊ उमेदवारी कायदा,१९६१ संदर्भ क्र. १ अन्वये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली राज्यात राबविण्यात येत आहे.

भारत सरकारच्या संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ३० किंवा त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ आहे, त्या आस्थापनेने वित्तिय वर्षात शिकाऊ उमेदवार भरती २.५ ते १५ % (महाराष्ट्रासाठी २५% ) पर्यंत करणे बंधनकारक आहे. तीन किंवा त्यापेक्षा कमी मनुष्यबळ असलेल्या आस्थापनेला शिकाऊ उमेदवारी घेण्यास मान्यता नाही. शिकाऊ उमेदवारी भरती करताना किमान ५% जागा फ्रेशर व कौशल्य प्रमाणपत्र धारक उमेदवारांसाठी आरक्षित ठेवण्यात याव्यात. ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ४ ते २९ पर्यंत मनुष्यबळ आहे, त्या आस्थापनेने शिकाऊ उमेदवारी भरती करणे बंधनकारक नाही, परंतु त्या आस्थापना शिकाऊ उमेदवार घेऊ शकतात. जे उमेदवार कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेचे/ कौशल्य प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण पूर्ण केलेले नसतात त्यांना मूलभूत प्रशिक्षण संस्थेव्दारे आस्थापनेमध्ये प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाते. केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ३ च्या अधिसूचनेनुसार सदर उमेदवारांना औद्योगिक आस्थापनेमध्ये त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विद्यावेतन देण्यात येते. तसेच

राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत केंद्र शासनामार्फत वेळोवेळी देण्यांत येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनूसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यांत येते.

शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत उमेदवारांची भरती राज्यात वाढविण्याकरीता प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने **"राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस"** (National Apprenticeship Promotion Scheme-NAPS) प्रशासकीय मान्यता देणे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय** :-

उपरोक्त पार्श्वभूमीवर शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत उमेदवारांची भरती वाढविण्यासाठी प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने **"राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस"** (National Apprenticeship Promotion Scheme-NAPS) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी खालिलप्रमाणे करण्यात येईल.

१. केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी करुन शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमधील शिकाऊ उमेदवारांना तसेच संबंधित मूलभूत प्रशिक्षण संस्थांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.
२. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाची द्विरुक्ती टाळण्यासाठी शिकाऊ उमेदवाराचा आधारक्रमांक संकेतस्थळास संलग्न करण्यात येईल.
३. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत २७ गटांतील २५८ निर्देशित (Designated), ३५ गटांतील ४१४ वैकल्पिक (Optional), ६ गटांतील २० तंत्रज्ञ (व्यावसायिक) [Technician (Vocational)] आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाचे १२३ व्यवसाय राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेसाठी समाविष्ट राहतील. सदरील व्यवसायांमध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणेनुसार सुधारीत व्यवसायही राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेमध्ये समाविष्ट राहतील.
४. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यासाठी आस्थापनांना दिनांक १९.०८.२०१६ पासून दरमहा प्रति शिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या २५% किंवा रु.१५००/- यापैकी कमी असलेली रक्कम आस्थापनेला देय असेल.
५. या योजनेअंतर्गत फ्रेशर शिकाऊ उमेदवारांच्या मुलभूत प्रशिक्षण कालावधीत ही रक्कम देय नाही. फ्रेशर शिकाऊ उमेदवारांच्या मुलभूत प्रशिक्षणाची रक्कम संबंधित मुलभूत प्रशिक्षण संस्थेस (BTC) (रु.७५००/- जास्तीत जास्त) ५०० तास/३ महिने एवढी देय राहील.
६. शिकाऊ उमेदवार भरतीचे प्रमाण वाढविण्यासाठी शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाने सुधारणा करुन संदर्भ क्र. २ नुसार सर्व औद्योगिक आस्थापनांना त्यांच्यांकडील मनुष्यबळाच्या २५% शिकाऊ उमेदवार प्राधान्याने भरती करण्यांचे आवाहन करण्यांत आले आहे.

७. संदर्भ क्र. ४ अन्वये ज्या आस्थापनेत (कंत्राटीकामगारांसहीत) ३० किंवा त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ आहे, त्या आस्थापनेने वित्तीय वर्षात शिकाऊ उमेदवारी भरती २.५% ते १५% (महाराष्ट्रासाठी २५%) पर्यंत करणे बंधनकारक आहे. शिकाऊ उमेदवारी भरती करताना किमान ५% जागा फ्रेशर व कौशल्य प्रमाणपत्रधारक उमेदवारांसाठी आरक्षित ठेवण्यात याव्यात. ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ४ ते २९ पर्यंत मनुष्यबळ आहे, त्या आस्थापनेने शिकाऊ उमेदवारी भरती करणे बंधनकारक नाही, परंतु त्या आस्थापना शिकाऊ उमेदवारी भरती करु शकतात. तीन किंवा त्यापेक्षा कमी मनुष्यबळ असलेल्या आस्थापनेला शिकाऊ उमेदवारी भरती करण्यास मान्यता नाही.

८. "राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना" १०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाकडून या योजनेकरिता दरवर्षी निधी उपलब्ध होणार आहे. निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी वेळोवेळी निधीची मागणी केंद्र शासनाकडे करावी.

९. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेसाठी "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य" यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील "लेखाअधिकारी" (महाराष्ट्र वित्त व लेखासंवर्ग) यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१०.राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेकरीता स्वतंत्र उप लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक उघडण्याची कार्यवाही संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी करावी.

११.सदर योजनेचा संदर्भ क्र. ५ नुसार निधीचा विनियोग/ खर्च PFMS प्रणालीमार्फत करण्यात येईल. यासाठी वित्त विभागाने निर्देशित केलेल्या बँकेत खाते उघडण्यात येवून संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी त्यांच्या स्तरावर नोडल अधिकारी घोषित करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२०८०२१५०५३५४७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VINOD SHESHRAO BONDRE

Digitally signed by VINOD SHESHRAO BONDRE
DN: c=IN, o=MAHARASHTRA STATE INNOVATION SOCIETY, ou=SKILL EMPLOYMENT ENTRRPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=4bd97b779f6f1e9e61491311a06aac663b01b00963f2e754c6ee2d5f7c14953d, postalCode=400021, st=Maharashtra, serialNumber=C313A8B86D67716D182C41D1E22F57D99C8EE5F4654A216D8FE23B5AD24ED271, cn=VINOD SHESHRAO BONDRE
Date: 2022.08.02 15:09:48 +05'30'

**(विनोद बोंदरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. प्रधान सचिव, कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, बेलापूर, नवी मुंबई
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई
६. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
८. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)
९. सर्व शासकीय कार्यालये/ महामंडळे/ महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषद/ जिल्हा परिषदा.
१०. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
११. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
१५. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)
१७. सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती/ व्यशि-३